जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
०७.०९.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्षः ०७ | अंकः ३२ | पृष्ठेः ०६ | किंमतः ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

### १२ जणांना वाचवलं, ५ जणांची मृत्यूशी झुंज

## दिल्लीत पाच मजली पीजी ईमारत कोसळून ६ जणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नवी दिल्ली** – दिल्लीत पाच मजली पीजी इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला. बारा जणांना वाचवण्यात आले, पाच जण गंभीर जखमी झाले असून त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले आहे. कोसळलेली इमारत ४० वर्षे जुनी होती. एमसीडीच्या नोंदींमध्ये तिचा धोकादायक म्हणून उल्लेख नव्हता. प्रत्यक्षदर्शी, पदव्युत्तर विद्यार्थी आणि शेजाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या सात दिवसांपासून तळघरात पाडकाम सुरू होते. आधीच कमकुवत असलेले तळघर पाण्याने भरले होते. रविवारी, खोदकामादरम्यान एक खांब निसटला आणि इमारत कोसळली, त्यामुळे काम करणारे कामगार गाडले गेले.

ढिगारा हटवण्याचे काम सुरू दरम्यान, अपघात झाल्यापासून ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे. शेजारील दुसरी इमारत रिकामी करण्यात आली असून, तिलाही तडे गेल्याचे दिसून आले आहे. बचाव पथकांचे म्हणणे आहे की, ढिगारा हटवल्याने इमारत कोसळण्याचा धोका आहे. दरम्यान, इमारतीला आधार देण्यासाठी खांब बसवले जात आहेत. इमारतीचा मालक आनंद बन्सल असून तो गुरुग्राममध्ये राहतो. पोलिसांनी या प्रकरणात सदोष मनुष्यवध आणि निष्काळजीपणाच्या कलमांखाली एफआयआर दाखल केला आहे. दिल्लीचे महापौर परवेश वाही यांनी सांगितले की, चार मजल्यांपेक्षा जास्त उंचीची सर्व बेकायदेशीर बांधकामे तत्काळ सील केली जातील. दोषी अधिकाऱ्यांना बडतर्फ केले जाईल. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सत्य निकेतन येथील पीजी कोसळल्याप्रकरणी दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले आहेत.

दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण कॅम्पसजवळील परिसर एमसीडीच्या ६ सप्टेंबरच्या आदेशानुसार सत्य निकेतनमधील सर्व जीर्ण आणि धोकादायक इमारती पाडण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.सत्य निकेतन हा दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण कॅम्पसजवळ असलेला एक प्रमुख विद्यार्थी परिसर आहे. येथे मोठ्या संख्येने विद्यार्थी पीजी आणि वसतिगृहांमध्ये राहतात. या परिसरात अनेक विद्यार्थी निवासस्थाने आणि व्यंकटेश्वर कॉलेज, आर्यभट्ट कॉलेज, मोतीलाल नेहरू कॉलेज आणि मैत्रेयी कॉलेज यांसारख्या जवळपासच्या संस्था आहेत.

## भाषण संपवून स्टेजवरुन माघारी निघाले, गर्दीतून 'ती' घोषणा ऐकताच राज ठाकरे गर्रकन वळले, माईक हातात घेऊन विचारलं...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी रविवारी ठाण्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला संबोधित केले.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात देशाचा जीडीपी, बेरोजगारी, धर्मांधता, मराठी-हिंदी वाद अशा विविध मुद्द्यांवरुन भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. राज ठाकरे यांच्या या भाषणाची राजकीय वतुर्ळात चांगलीच चर्चा आहे. मात्र, या भाषणानंतर घडलेला आणखी एक प्रसंग राज ठाकरे यांच्या आगामी राजकीय दिशा दाखवून देणारा ठरला. राज ठाकरे यांनी काल ठाण्यात साधारण पाऊस तास भाषण केले.

या भाषणात राज ठाकरे यांनी विविध मुद्द्यांवरुन सत्ताधाऱ्यांची पिसं काढली. हे भाषण संपल्यानंतर राज ठाकरे पोडिअमवरुन बाजूला झाले आणि स्टेजवरुन उतरण्यासाठी खाली जात होते. त्याचवेळी समोरुन मनसेचे काही कार्यकर्ते घोषणा देत होते. यापैकी एक घोषणा ऐकून राज ठाकरे गर्रकन मागे वळले. ते मागे वळून पुन्हा माईकच्या दिशेने निघाले. तेव्हा काहीवेळ मनसेचे नेते आणि कार्यकर्त्यांना नेमकं काय झालं, हेच समजत नव्हतं. आपल्या तोंडातून काही अद्वातद्वा शब्द बाहेर पडला की काय आणि आता राज ठाकरे माईकवरुन सर्वांदेखत कानउघडणी करणार की काय, अशी भीती काहींना वाटली.
राज ठाकरे यांनी पुन्हा माईकचा ताबा घेतल्यानंतर त्यांच्या नेहमीच्या करड्या आणि रोखठोक आवाजाच कार्यकर्त्यांकडे पाहून विचारलं की, 'इन्कलाब जिंदाबाद कोण म्हटलं?' त्यावर साहजिकच समोरुन लगेच उत्तर आले नाही. तेव्हा राज ठाकरे म्हणाले की, इन्कलाब जिंदाबाद ही घोषणा द्यायची बरं का... ही भगतसिंगांची घोषणा आहे.'

एवढं सांगून राज ठाकरे पुन्हा माघारी वळले आणि निघून गेले. मात्र, हा प्रसंग अनेकांच्या मनात कोरला गेला. राज ठाकरे यांनी कालच्या भाषणात, 'देवावर श्रद्धा असू द्या, धर्माचा अभिमान असावा, पण धर्मांध होऊ नका', हा सल्ला आवर्जून दिला. भाजपकडून गेल्या काही काळात सातत्याने राष्ट्रीयत्त्वाच्या आणि राष्ट्रवादाच्या मुद्द्यावर भर देत राजकारण केले जात आहे.

### थोडक्यात

## शिवसेनेचे ऑपरेशन 'टायगर-४' लवकरच!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – 'उबाठा गटाचे २० पैकी १४ आमदार सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून, 'ग्रीन सिग्नल' मिळताच लवकरच 'ऑपरेशन टायगर-४' प्रत्यक्षात येईल आणि हे आमदार शिवसेनेत प्रवेश करतील', असा दावा अंधेरी पूर्व मतदारसंघाचे आमदार मुरजी पटेल यांनी सोमवारी केला.

याविषयी माध्यमांशी बोलताना आमदार पटेल म्हणाले की, १४ आमदारांच्या पक्षप्रवेशाला ग्रीन सिग्नल मिळाला की ही मोहीम फत्ते होईल. आगामी काळात आमदारांनंतर उबाठा गटातील काही नगरसेवकही शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत दाखल होऊ शकतात.

## सोनोरीत नरभक्षक वाघिणीचा थैमान : २२ वर्षीय उर्मिलाचा दुर्दैवी बळी

**सकाळी २ शेळ्या फडशा पाडल्यानंतर शेतात चारा आणायला गेलेल्या तरुणीवर झडप**

**संतप्त ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन, ड्रोनच्या साहाय्याने वाघिणीचा शोध सुरू**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मोर्शी / चांदूरबाजार*** – मोर्शी तालुक्यातील भांबोरा परिसरात एका शेतकऱ्याचा जीव घेतल्यानंतर आता चांदूर बाजार तालुक्यात दाखल झालेल्या नरभक्षक वाघिणीने रविवारी सोनोरी गावात थरकाप उडवला. शेतात जनावरांसाठी चारा गोळा करायला गेलेल्या २२ वर्षीय उर्मिला बाजीराव इवाणे या निष्पाप तरुणीवर दबा धरून बसलेल्या वाघिणीने अचानक झडप घालून तिचा जागीच बळी घेतला. तर सकाळी याच वाघिणीने दोन शेळ्या फडशा पाडल्या असून मेंढपाळाने प्रसंगावधान राखून पळ काढल्याने त्याचे प्राण वाचले. सोनोरी गावालगत असलेल्या ई-क्लास जमिनी वरील झुडपी जंगलात रविवारी सकाळी दहा वाजता मेंढपाळ सोमा पराते शेळ्या चारत होते. त्यावेळी अचानक समोरून आलेल्या वाघिणीने शेळ्यांवर झडप घातली. समोर प्रत्यक्ष वाघ पाहताच घाबरलेल्या सोमा पराते यांनी झुडपांचा आडोसा घेत गावाच्या दिशेने धूम ठोकली आणि गाव गाठले. मात्र वाघिणीने दोन शेळ्या



जागीच ठार मारल्या. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक गावात दाखल झाले.

दुपारनंतर उर्मिला बाजीराव इवाणे ही तरुणी शेतात शेळ्यांसाठी पाला आणायला गेली होती. सायंकाळपर्यंत ती घरी परत न आल्याने घरच्यांची काळजी वाढली. वाघीण फिरत असलेल्या भागातच काहीतरी विपरीत घडल्याची शंका आल्याने कुटुंबीयांनी शेतात शोध सुरू केला. तिथे तिचा पडलेला भ्रमणध्वनी आणि रक्ताचे डाग दिसल्याने सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला. काही अंतरावर उर्मिलाचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. वाघिणीने तिच्या गळ्याला पकडून ठार मारल्याचे समोर आले. आपल्या तरुण मुलीचा असा क्रूर अंत पाहून कुटुंबीयांनी केलेला आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.

**मोर्शीतील वाघिणीचा चांदू बाजारात प्रवेश**

मोर्शीत शेतकऱ्याचा बळी घेणारी हीच वाघीण सुमारे पन्नास किलोमीटरची पायपीट करून चांदूर बाजार तालुक्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. दोन दिवसांपूर्वी रिद्धपूर नजीक नजरपूर शिवारात तिने गायीवर हल्ला केला होता.

**गावकऱ्यांकडून वन विभागाच्या वाहनाची तोडफोड**

या भीषण घटनेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी वनविभाग आणि पोलीस प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करत गावात ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.




## समृद्धी महामार्गावरील लूट प्रकरणी कारवाई : फिल्मी स्टाईल सापळा रचून ७ आरोपींना ठोकल्या बेड्या, आरोपींची संख्या पोहचली ११ वर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – समृद्धी महामार्गावर झालेल्या लूटप्रकरणी प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला बीडमधून बेड्या ठोकल्यानंतर संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी आणखी चार आरोपींना फिल्मी स्टाईलमध्ये ताब्यात घेतले आहे.

रेतीचा हायवा चालवण्यासाठी दहा हजार रुपये देऊ, असे म्हणत आरोपीला सापळ्यात अडकवून ही कारवाई करण्यात आली. समृद्धी महामार्गावरील लूटप्रकरणी आरोपीला आमिष दाखवून वेशांतर केलेल्या पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईत गुटखामाफीयासह चार फरार आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्याय. याआधी याप्रकरणी पोलिसांनी ७ आरोपींना अटक केली होती. आता ४ आरोपींना अटक केल्याने या प्रकरणातील आरोपींची संख्या ११ वर पोहचली आहे.



# श्री चिंतेश्वर दत्त मंदिर येथे श्रीकृष्ण जयंतीचा दोन दिवशीय कार्यक्रम संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक श्री चक्रधर मंडळ द्वारा आयोजित श्री चिंतेश्वर दत्त मंदिर येथे श्रीकृष्ण जयंतीचा दोन दिवशीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यामध्ये कृष्ण जन्म अध्याय व त्यानंतर उत्साहामध्ये कृष्णजन्म ढोल ताशाच्या गजरात संपन्न करण्यात आला. सकाळी ९ वाजता गीता पारायण, ११ वाजता देवाला मंगल स्नान, विडा अवसर करुन १२ वाजता महाआरती व त्यानंतर महाप्रसाद संपन्न झाला. दुपारी ३.३० वाजता सर्वज्ञ महिला मंडळाच्या भगिनींनी दांडिया नृत्य सादर करुन उपस्थित सर्व भाविक भक्तांचे मन जिंकले. त्यानंतर ५ वाजता १६ वर्षाआतील मुला मुलींसाठी दहीहंडी संपन्न करण्यात आली. दहीहंडीला ४० स्पर्धकांनी सहभाग घेऊन प्रथम दहीहंडी फोडणाऱ्या पाच स्पर्धकांना मोठी बक्षिसे तसेच सर्व भाग घेणाऱ्या स्पर्धकाना प्रोत्साहनपर बक्षिसे वितरित करण्यात आली. या कार्यक्रमाला वरुड पंचक्रोशीतील शेकडो भाविक भक्तांनी भरभरुन दाद दिली. सायंकाळी ७ च्या आरती नंतर संपूर्ण कार्यक्रमाचा जल्लोशात समारोप झाला.

न्यू इंग्लिश प्राथमिक शाळेत

# श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – न्यू इंग्लिश प्राथमिक शाळा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी नर्सरी ते इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी राधा व श्रीकृष्णाची सुंदर वेशभूषा करून शाळेत हजेरी लावली. रंगीबेरंगी पोशाख, मुकूट, मोरपिसे आणि पारंपरिक वेशभूषेतील हे चिमुकले राधा–कृष्ण सर्वांचे आकर्षण ठरले. त्यांच्या निरागस हास्याने व उत्साहाने कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका कोमल पांडव यांचे हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली विविध सांस्कृतिक सादरीकरणे. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीवर आधारित सुंदर नृत्य सादर केले. त्यांच्या तालबद्ध नृत्याने आणि उत्स्फूर्त अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला सर्वांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. याच दिवशी ५ सप्टेंबर हा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन असल्यानेत्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. विद्यार्थ्यांना डॉ.राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती देण्यात आली. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व आणि शिक्षक–विद्यार्थी यांच्यातील प्रेमाचे नाते याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शाळेतील सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे अतिशय सुंदर पद्धतीने केले. विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी मार्गदर्शन, सराव आणि आवश्यक तयारी करुन देण्यात शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.

युथ नॅशनल इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये

# कृष्णजन्माष्टमी व दहीहंडी उत्साहात



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी युथ नॅशनल इंग्लिश कॉन्व्हेंट, पुसला येथेही विद्यार्थ्यांनी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आनंदात साजरी केली. यावेळी कृष्णजन्माष्टमीसोबत दहीहंडी कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाला युथ नॅशनल इंग्लिश कॉन्व्हेंट, पुसलाचे संचालक सुरज धर्मे व जावेद शेख तसेच शिक्षिका चैताली बमनोटे, गायत्री बहादुरे, शिफा शेख व अल्फीया शेख यांची उपस्थिती होती. तसेच मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व पारंपरिक सणांची माहिती मिळावी, तसेच त्यांच्यात सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेतर्फे भूषण उमाळे व शैलेश सरोदे यांचा राष्ट्रगौरव पुरस्कार २०२६ ने सन्मान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड**– कला, सामाजिक कार्य तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित 'राष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' सोहळ्यात श्री हरी प्युअर व्हेजचे संचालक भूषण उमाळे व शैलेश सरोदे यांना मानाचा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. ३० ऑगस्ट रोजी द कल्चर हॉटेल, आळंदी, पुणे येथे हा पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रांत आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. श्री हरी प्युअर व्हेजच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार खाद्यपदार्थ, उत्तम सेवा आणि विश्वासार्हता देण्याबरोबरच व्यवसाय क्षेत्रात सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल भूषण उमाळे व शैलेश सरोदे यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना 'राष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.






राजुरा ते मुसळखेडा पायी दिंडी सोहळ्यात

# अनुसया महिला भजन मंडळाचा उत्स्फूर्त सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री क्षेत्र मुसळखेडा येथे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राजुरा ते मुसळखेडा पायी दिंडी सोहळ्यात वडाळा येथील अनुसया महिला भजन मंडळ उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहे.

विठ्ठलनामाचा गजर, अभंग–भजन आणि टाळ–मृदंगाच्या भक्तिमय वातावरणात ही पायी दिंडी श्री क्षेत्रमुसळखेड्याकडे मार्गस्थ होते. दिंडीत सहभागी महिला भाविकांकडून विठ्ठल–रुक्मिणीच्या नामस्मरणासह विविध भक्तिगीते व अभंग सादर केले जातात.

अनुसया महिला भजन मंडळाच्या सहभागामुळे दिंडी सोहळ्याला भक्तिमय वातावरणाची जोड मिळते. 'ज्ञानोबा–तुकाराम' तसेच 'विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल' या जयघोषाने परिसर दुमदुमून जातो.

या पायी दिंडीच्या माध्यमातून भक्ती, श्रद्धा, एकता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात येत असून, दरवर्षी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## महाराष्ट्र स्वतंत्र डेटा सेंटर धोरण तयार करणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र हे स्वतःचे स्वतंत्र डेटा सेंटर धोरण आणणारे देशातील पहिले राज्य ठरण्याची शक्यता आहे. या धोरणांतर्गत अशा प्रकारच्या सुविधांसाठी सर्वसमावेशक मानके व कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहेत. वेगाने वाढणाऱ्या या डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आयआयटी मुंबई'सोबत हातमिळवणी केली आहे. ठाण्यातील बाळकुम परिसरात उभारल्या जाणाऱ्या 'अ‍ॅमेझॉन वेब सर्व्हिसेस'च्या डेटा सेंटरविरोधात स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला होता.

# न्यू कॅलिफोर्निया स्कूल येथे गोकुळाष्टमीचा कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – गुरु सेवा शैक्षणिक विकास संस्था द्वारा अंतर्गत न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे कृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे गुरुसेवा शैक्षणिक विकास संस्थेचे अध्यक्ष अमोल निंभोरकर, उपाध्यक्ष पंकज गोहाड, सचिव स्वाती निंभोरकर, न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूलचे मुख्याध्यापक हर्षल झोड, प्रायमरीच्या एच.ओ.डी.अश्विनी श्रीराव, प्री प्रायमरीच्या एच.ओ.डी मयुरी निशाण यांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाला शोभा आणली. या कार्यक्रमाचे आयोजन हे वर्ग नर्सरी ते पहिल्या वर्गापर्यंतचे विद्यार्थी राधाकृष्णन यांच्या वेशभूषा मध्ये बोलाविण्यात आले.

वर्ग ४ ते ९ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या कृष्ण जन्माष्टमीनिमित्त होत असलेल्या नृत्यांमध्ये आपली उपस्थिती दर्शवली. वर्ग ८ व ९ च्या विद्यार्थ्यांनी लेझीमचे उत्तम प्रदर्शन केले. वर्ग नववी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे मनोरा करुन दहीहंडी फोडण्याचा मान नैतिक गोहाड याने पटकाविला. या कार्यक्रमांमध्ये राधाकृष्णन स्पर्धेचा निकाल मुख्य अतिथी द्वारे जाहीर करण्यात आला. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते काही गिफ्ट देण्यात आले. त्यानंतर टेबल आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचे बक्षिस वितरण अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी रिया बऱ्हाटे व जिज्ञासा शर्मा तर उपस्थितांचे आभार ओम अढाऊ यांने मानले.

# 'हर हर महादेव'च्या जयघोषाने शहर दुमदुमले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

श्री पाताळेश्वर देवस्थानच्या वतीने शहरात भव्य कावड यात्रा





**वरुड** – श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त शहरातील श्री पाताळेश्वर देवस्थानच्या वतीने भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. शहरातील विविध भागांतून कावडधारी भाविक मोठ्या उत्साहात सहभागी झाले. या धार्मिक यात्रेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

सकाळपासूनच शहरातील विविध भागांमध्ये कावडधारी भाविकांची लगबग सुरु होती. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला व पुरुष भाविकांनी हातात कावड घेऊन 'हर हर महादेव', 'बम बम भोले' अशा जयघोषात यात्रा काढली. ठिकठिकाणी नागरिकांनी कावडधारी भाविकांचे स्वागत केले. कावड यात्रेदरम्यान शहरातील प्रमुख मार्गांवरून मिरवणुक काढण्यात आली. भक्तिमय गीत, भजन आणि महादेवाच्या जयघोषामुळे संपूर्ण शहराचे वातावरण शिवमय झाले. विशेष म्हणजे यंदाच्या कावड यात्रेत महिलांचा लक्षणीय सहभाग पाहायला मिळाला. अनेक महिलांनी श्रद्धेने कावड खांद्यावर घेत सहभागी होत धार्मिक परंपरेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पाताळेश्वर देवस्थान येथून काढण्यात आलेली कावडयात्रा शहरातील मुख्य मार्गाने केदारेश्वर देवस्थान येथे व तेथून श्री संत गजानन महाराज देवस्थान व तेथुन पुन्हा परत पाताळेश्वर देवस्थान येथे येवुन समारोप करण्यात आला.

यात्रेच्या मार्गावर भाविकांसाठी विविध ठिकाणी पिण्याचे पाणी, सरबत व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली. आयोजक तसेच स्वयंसेवकांनी यात्रेदरम्यान शिस्त व सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली. भाविकांनीही शांततेत व भक्तिभावाने यात्रेत सहभाग घेतला.

कावड यात्रा श्री पाताळेश्वर देवस्थान परिसरात पोहोचल्यानंतर भगवान शिवाची विधिवत पूजा–अर्चा करण्यात आली. कावडीतील पवित्र जलाने शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात आला. यावेळी परिसरात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

श्री पाताळेश्वर देवस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कावडयात्रेमुळे वरुड शहरातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला उजाळा मिळाला. महिलांसह युवक, ज्येष्ठ नागरिक आणि शिवभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने यंदाची कावड यात्रा विशेष आकर्षण ठरली.

# संपादकीय

## मन खंबीर असेल तर कोणतेही संकट लहान वाटते

### वाघिणीचा मुक्त संचार की व्यवस्थेचा अपयश?

मोर्शी तालुक्यातील भांबोरा परिसरात शेतकऱ्याचा बळी घेतल्यानंतर चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी येथे २२ वर्षीय उर्मिला बाजीराव इवाणे या तरुणीचा नरभक्षक वाघिणीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आणि संपूर्ण अमरावती जिल्हा हादरला. सकाळी दोन शेळ्या ठार मारल्यानंतर दुपारी चारा आणण्यासाठी गेलेल्या तरुणीवर वाघिणीने झडप घालणे ही केवळ वन्यजीवांच्या वर्तनाची घटना नाही; ती ग्रामीण भागातील सुरक्षितता, वनव्यवस्थापन आणि प्रशासनाच्या प्रतिसादावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी शोकांतिका आहे. एका निष्पाप तरुणीचा जीव गेल्यानंतर गावागावात निर्माण झालेली भीती ही केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून व्यवस्थेतील उणिवांचे जिवंत चित्र आहे. महाराष्ट्रात वाघसंख्या वाढणे हे निश्चितच आनंदाचे आणि संवर्धनाच्या दृष्टीने यशाचे लक्षण आहे. मेलघाट व्याघ्र प्रकल्पासारख्या भागांमुळे राज्याने वाघसंवर्धनात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मात्र, जंगलांचे क्षेत्र कमी होणे, नैसर्गिक अधिवासांवर मानवी अतिक्रमण वाढणे आणि अन्नसाखळीतील बदल यामुळे वाघांचे गावांकडे स्थलांतर वाढत आहे. अशा परिस्थितीत वाघांचे संरक्षण आणि नागरिकांचे प्राणरक्षण या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडण्याची वेळ वनविभागावर आली आहे. मोर्शीत शेतकऱ्याचा बळी घेणारी वाघीण सुमारे पन्नास किलोमीटरचा प्रवास करत चांदूर बाजारपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते. वाटेत तिने गुरांवर हल्ले केले, अनेक ठिकाणी तिचे दर्शन झाले आणि नागरिकांनी वनविभागाला वारंवार माहिती दिली. पिंजरे लावण्यात आले, कॅमेरे बसवण्यात आले, ड्रोनचा वापरही सुरू झाला; मात्र या सर्व उपाययोजनांनंतरही आणखी एक निष्पाप जीव गमवावा लागला. यामुळे प्रश्न निर्माण होतो की, धोका स्पष्ट दिसत असताना प्रतिबंधात्मक उपाय पुरेसे प्रभावी होते का? ग्रामीण भागातील जीवनशैली शहरांपेक्षा वेगळी असते. शेतकरी, मजूर, महिला आणि मेंढपाळ यांना रोजच्या उपजीविकेसाठी शेतात, जंगलाच्या कडेला किंवा माळरानावर जावेच लागते. 'घराबाहेर पडू नका' असे आवाहन करणे सोपे असले, तरी त्यांच्या उदरनिर्वाहाचा पर्याय कोण देणार? त्यामुळे अशा परिस्थितीत केवळ सूचना देणे पुरेसे नसून धोक्याच्या भागात तात्पुरते गस्त पथक, सायरन व्यवस्था, सार्वजनिक इशारा यंत्रणा आणि सुरक्षित मार्ग निश्चित करणे आवश्यक आहे. सोनोरीतील घटनेनंतर ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यांच्या संतापामागे केवळ दुःख नाही, तर असुरक्षिततेची भावना आहे. प्रशासनाने घटना घडल्यानंतर शोधमोहीम वाढवली; परंतु गावकऱ्यांच्या अपेक्षा त्यापेक्षा पुढे आहेत. नरभक्षक घोषित झालेल्या प्राण्याला तातडीने पकडण्यासाठी विशेष प्रशिक्षित पथके, भूलतज्ज्ञ आणि आधुनिक उपकरणांची उपलब्धता प्रत्येक संवेदनशील जिल्ह्यात असायला हवी. अनेकदा प्रक्रिया, परवानग्या आणि तांत्रिक अडचणींमध्ये वेळ निघून जातो आणि त्याची किंमत नागरिकांना जीव गमावून चुकवावी लागते.

# कर्जमाफीचा भार, जनतेच्या खांद्यावर

देशाच्या अर्थव्यवस्थेत कर्ज ही विकासाची आवश्यक बाब मानली जाते. उद्योग उभारण्यासाठी, रोजगार निर्माण करण्यासाठी आणि पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी बँकांकडून कर्ज दिले जाते. मात्र, जेव्हा हजारो कोटी रुपयांची कर्जे मोठ्या कंपन्यांकडून वसूल होत नाहीत किंवा ती विविध प्रक्रियांतून माफ केली जातात, तेव्हा त्याचा फटका केवळ बँकांनाच बसत नाही; तर संपूर्ण अर्थव्यवस्था त्याची किंमत मोजते. सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षण, आरोग्य आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. त्यामुळे बड्या कंपन्यांच्या कर्जवसुलीचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून सामाजिक न्यायाचाही विषय ठरतो.

देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँका नागरिकांच्या ठेवींवर चालतात. शेतकरी, कामगार, कर्मचारी, लघुउद्योजक आणि मध्यमवर्गीय लोक आपल्या आयुष्याची बचत या बँकांमध्ये ठेवतात. हीच रक्कम उद्योगांना कर्ज म्हणून दिली जाते. परंतु मोठ्या उद्योगसमूहांची कर्जे थकली की बँकांच्या ताळेबंदावर त्याचा मोठा परिणाम होतो. अशा वेळी सरकारला बँकांना पुन्हा भांडवल पुरवावे लागते. हे भांडवल शेवटी करदात्यांच्या पैशातूनच येते. म्हणजेच मोठ्या कर्जदारांच्या अपयशाची किंमत सामान्य नागरिक भरत असतो.




याचा सर्वात मोठा परिणाम सेवा क्षेत्रावर होतो. बँकांचे आर्थिक आरोग्य बिघडल्यास नवीन कर्ज वितरणावर मर्यादा येतात. लघुउद्योग, स्टार्टअप, किरकोळ व्यापारी आणि सेवा व्यवसायांना कर्ज मिळणे कठीण होते. परिणामी रोजगारनिर्मितीचा वेग कमी होतो. अनेक तरुणांना उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक आर्थिक मदत मिळत नाही. त्यामुळे बेरोजगारी वाढण्याची शक्यता निर्माण होते.

कृषी क्षेत्रावरही याचा गंभीर परिणाम होतो. शेतकऱ्यांना पीककर्ज, सिंचनासाठी कर्ज किंवा शेतीच्या आधुनिकीकरणासाठी आर्थिक मदत वेळेवर मिळणे आवश्यक असते. मात्र बँकांवर मोठ्या थकीत कर्जांचा भार वाढल्यास त्या अधिक सावध भूमिका घेतात. कर्ज मंजुरी कठीण होते किंवा अटी कडक होतात. अनेक लहान शेतकरी सावकारांच्या दारात जाण्यास भाग पडतात. त्यामुळे कर्जाच्या दुष्टचक्रात ते अधिक अडकतात. एका बाजूला उद्योगांना हजारो कोटींची कर्जे मिळतात, तर दुसऱ्या बाजूला काही लाखांच्या कर्जासाठी शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, ही विसंगती समाजात असंतोष निर्माण करते.

शिक्षण क्षेत्रावर होणारा परिणाम अधिक चिंताजनक आहे. सरकारच्या महसुलावर दबाव वाढला की सार्वजनिक खर्चाचे प्राधान्य बदलते. अनेकदा शासकीय शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना किंवा संशोधनासाठीचा निधी कमी पडतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणाच्या संधी मर्यादित होतात. उच्च शिक्षणाचे शुल्क वाढल्यास गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. देशाच्या भविष्यातील मानवी भांडवलावर याचा परिणाम होतो.

आरोग्य क्षेत्रातही अशीच परिस्थिती दिसते. सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, औषध पुरवठा आणि वैद्यकीय सुविधा यासाठी मोठ्या प्रमाणात सार्वजनिक गुंतवणूक आवश्यक असते. आर्थिक संसाधनांवर ताण आल्यास या सुविधांचा विस्तार मंदावतो. परिणामी सामान्य नागरिकांना महागड्या खासगी आरोग्यसेवेवर अवलंबून राहावे लागते. गरीब कुटुंबे उपचारांसाठी कर्जबाजारी होण्याची वेळ येते. अशा परिस्थितीत मोठ्या कर्जबुडव्यांचा प्रश्न केवळ बँकांचा राहत नाही; तो प्रत्येक घराच्या आरोग्याशी जोडला जातो.

याचबरोबर नैतिकतेचाही प्रश्न निर्माण होतो. लहान कर्जदार काही हप्ते थकले तरी त्यांच्यावर तत्काळ कारवाई होते. नोटिसा दिल्या जातात, मालमत्ता जप्त केली जाते किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू होते. मात्र मोठ्या उद्योगसमूहांच्या बाबतीत पुनर्रचना, दीर्घकालीन प्रक्रिया किंवा दिवाळखोरी यंत्रणेद्वारे वेगळी हाताळणी केली जाते. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात न्यायव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

तथापि, एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. बँकांच्या 'कर्जमाफी', 'राइट-ऑफ' आणि 'कर्जवसुली' या संज्ञा एकसारख्या नाहीत. अनेकदा बँका थकीत कर्जे आपल्या ताळेबंदातून वेगळी दाखवण्यासाठी 'राइट-ऑफ' करतात, म्हणजे वसुलीची प्रक्रिया संपतेच असे नाही. तरीसुद्धा जर मोठ्या प्रमाणावर कर्जाची प्रभावी वसुली होत नसेल, तर त्याचा आर्थिक परिणाम वास्तवात जाणवतो. त्यामुळे पारदर्शकता आणि जबाबदारी या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या ठरतात.

या समस्येवर उपायही शक्य आहेत. मोठ्या कर्जांच्या मंजुरीत अधिक कठोर पडताळणी, वेळेवर देखरेख, फसवणूक करणाऱ्यांवर जलद कारवाई, दिवाळखोरी प्रक्रियेची गती वाढवणे आणि कर्जवसुली यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर लघुउद्योग, शेतकरी आणि प्रामाणिक कर्जदारांना सुलभ कर्जपुरवठा कायम ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अर्थव्यवस्थेचा पाया केवळ मोठ्या उद्योगांवर उभा राहत नाही; तो शेतकरी, कामगार, शिक्षक, डॉक्टर, उद्योजक आणि सामान्य नागरिक यांच्या योगदानावर टिकून असतो. त्यामुळे आर्थिक धोरणांचा केंद्रबिंदू केवळ मोठ्या कर्जदारांचे संरक्षण नसून सार्वजनिक हित असायला हवा. बड्या कंपन्यांच्या थकीत कर्जांबाबत कठोर आणि पारदर्शक भूमिका घेतली गेली, तर बँकांची विश्वासार्हता वाढेल, सार्वजनिक संसाधनांचा योग्य वापर होईल आणि शिक्षण-आरोग्यासारख्या मूलभूत क्षेत्रांना आवश्यक बळ मिळेल. शेवटी, अर्थव्यवस्थेची खरी ताकद ही ताळेबंदातील आकड्यांत नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात दिसली पाहिजे.

# घोटाळ्यांचे सावट आणि विश्वासाचा ऱ्हास

देशाच्या विकासाचा पाया हा पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनावर उभा असतो. मात्र, जेव्हा वारंवार आर्थिक, बँकिंग, भरती, बांधकाम किंवा सरकारी योजनांमधील घोटाळ्यांच्या बातम्या समोर येतात, तेव्हा सर्वात मोठे नुकसान केवळ पैशाचे होत नाही, तर जनतेच्या विश्वासाचे होते. घोटाळे ही आता अपवादात्मक घटना न राहता व्यवस्थेतील गंभीर त्रुटींचे प्रतीक बनत चालली आहेत. गेल्या काही वर्षांत बँक कर्ज, सहकारी संस्था, सरकारी खरेदी, परीक्षा आणि भरती प्रक्रिया, तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक घोटाळे चर्चेत राहिले.

प्रत्येक वेळी चौकशी, समित्या आणि कारवाईची घोषणा होते; पण काही काळानंतर तो विषय मागे पडतो. त्यामुळे 'घोटाळा होतो, चौकशी होते आणि नंतर सर्व विसरले जाते,' अशी भावना समाजात निर्माण होणे धोकादायक आहे. घोटाळ्यांचा सर्वात मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो. सरकारी निधीचा अपव्यय झाला की त्याचा परिणाम रस्ते, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा आणि इतर सार्वजनिक सुविधांवर होतो. विकासासाठी असलेला पैसा गैरव्यवहारात अडकला की नागरिकांना निकृष्ट दर्जाच्या सुविधा स्वीकाराव्या लागतात. प्रामाणिक करदात्यांच्या पैशाचा असा अपव्यय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का देतो.

भरती आणि परीक्षा घोटाळे तर तरुणांच्या भविष्याशी थेट खेळ करतात. अनेक वर्षे मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होते.




गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व मिळत असल्याचा संदेश समाजात गेला, तर मेहनतीवरील विश्वास कमी होण्याचा धोका निर्माण होतो. घोटाळ्यांचे आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे प्रामाणिक अधिकारी आणि संस्थांवरही संशयाची छाया पडते. काही मोजक्या व्यक्तींच्या भ्रष्ट वर्तनामुळे संपूर्ण यंत्रणेची प्रतिमा मलीन होते. त्यामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कठोर शिक्षा ही केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक गरज बनते. या परिस्थितीत केवळ घोटाळा उघड करणे पुरेसे नाही; तर तो पुन्हा होऊ नये यासाठी मजबूत यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

# शिक्षक -भविष्य घडविणारा खरा शिल्पकार

कर्तव्य आणि संस्कार यांचा उत्तम मिलाप म्हणजे शिक्षक. शीलवान, क्षमाशील आणि कर्तुत्वाचा महामेरू असणारा हा शिक्षक समाजाचा दीप प्रज्वलित करण्यास म्हणजेच उद्याच्या आधारस्तंभाची पायाभरणी करण्यास सदैव तत्पर व दक्ष असतो. वैयक्तिक क्रांतीचा नवा आयाम म्हणजे शिक्षक. पारंपरिक विचारांशी जुळवून घेताना नव्या विचारांशी तादात्म्य साधनाऱ्या आणि विद्येची साधना करणाऱ्या या शिक्षकाला संस्कारातून सभ्यतेकडे आणि विचारातून सुविचाराकडे नेण्याची कला लिलया येते. उत्तम गुणांनी शृंगारलेला, बहुतांमध्ये शोभणारा आपला विद्यार्थी असावा असा ध्यास घेतलेल्या शिक्षकाचा ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करतात, ही फार अभिमानाची बाब आहे.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या आधुनिक युगात शिक्षक दिनाचे महत्त्व आणि गरज अधिक अधोरेखित होताना दिसते. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपण शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. हा दिवस आपल्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या, ज्ञानाचा प्रकाश पसरवणाऱ्या आणि व्यक्तिमत्व घडवणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा विशेष दिवस आहे. शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार मानले जातात, कारण ते विद्यार्थ्यांच्या मनात संस्कार, मूल्ये आणि स्वप्नांची बीजे रोवतात.

आजच्या डिजिटल युगात माहिती मिळवणे खूप सोपे झाले आहे. मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन क्लासेस यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या अनेक साधनांचा लाभ मिळतो. परंतु या माहितीच्या



महासागरात योग्य काय आणि अयोग्य काय, हे ओळखून देण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकच करतात. शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांतील धडे शिकवत नाहीत, तर त्यांना विचार करण्याची क्षमता, निर्णय घेण्याची ताकद आणि जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याचे धैर्य देतात. आजच्या काळात विद्यार्थ्यांवर अनेक प्रकारचे ताणतणाव असतात स्पर्धा, करिअरची चिंता, सामाजिक दबाव इत्यादी. अशा वेळी शिक्षक हे मार्गदर्शक, सल्लागार आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहतात. ते विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देतात आणि त्यांच्या क्षमतांचा विकास घडवून आणतात. शिक्षक दिन साजरा करण्यामागचा उद्देश केवळ औपचारिक कार्यक्रम करणे नसून, शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणे आणि त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवणे हा आहे. या दिवशी विद्यार्थी शिक्षकांविषयी आदर व्यक्त करतात, त्यांचे आभार मानतात आणि त्यांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व ओळखतात. तसेच हा दिवस शिक्षकांनाही त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन देतो. एकूणच, आजच्या प्रगत आणि स्पर्धात्मक युगात शिक्षक दिन हा केवळ उत्सव नसून समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षकांची गरज किती महत्त्वाची आहे, याची आठवण करुन देणारा दिवस आहे. शिक्षकांचे कार्य हे अमूल्य असून त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय उज्ज्वल भविष्याची कल्पनाही अशक्य आहे. म्हणूनच प्रत्येकाने शिक्षकांचा सन्मान करुन त्यांच्या कार्याचा आदर करणे हीच खरी शिक्षक दिनाची खरी ओळख आहे. शिक्षक दिन खऱ्या अर्थाने सार्थकी लावायचा असेल, तर तो केवळ फुलं देणे किंवा कार्यक्रम साजरा करण्यापुरता मर्यादित ठेवू नये. त्यामागील भावना आणि कृती महत्त्वाच्या असतात. सर्वप्रथम, शिक्षकांप्रती मनापासून आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. एक साधं धन्यवाद सुद्धा शिक्षकांसाठी खूप मोलाचं असतं. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपल्या आयुष्यात काय बदल झाला, हे सांगणे अधिक प्रभावी ठरते. दुसरे म्हणजे, शिक्षकांनी दिलेले ज्ञान आणि मूल्ये आपल्या वर्तनात उतरवणे हेच त्यांना खरे अभिवादन आहे. प्रामाणिकपणा, शिस्त, मेहनत आणि चांगले संस्कार यांचा अंगीकार केल्यास शिक्षक दिनाचा उद्देश पूर्ण होतो. तिसरे म्हणजे, विद्यार्थ्यांनी त्या दिवशी काही सकारात्मक संकल्प करावेत जसे की नियमित अभ्यास करणे, वाईट सवयी टाळणे, इतरांना मदत करणे. हे संकल्प पाळले तर शिक्षकांना खरा आनंद मिळतो. तसेच, समाजासाठी काही चांगले काम करणे जसे वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, लहान मुलांना शिकवणे यातून शिक्षकांनी दिलेल्या मूल्यांची अंमलबजावणी करता येते. शेवटी, शिक्षक दिन म्हणजे केवळ एक दिवस नाही, तर शिक्षकांच्या शिकवणुकीनुसार आयुष्यभर जगण्याची प्रेरणा आहे. शिक्षकांचा सन्मान आपल्या कृतीतून दिसला, तरच शिक्षक दिन खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.




विनोद गाढे
गटशिक्षणाधिकारी, पं.स.वरुड
७३५०००६२६१

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### श्री क्षेत्र मुसळखेडा येथे श्री यशवंत लिलामृत ग्रंथाचे

# उदया सामुहिक पारायण व महाप्रसादाचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – परमहंस श्री यशवंत महाराज यांच्या कृपेने श्री क्षेत्र मुसळखेडा येथे येत्या ८ सप्टेंबर रोजी 'श्री यशवंत लिलामृत' या ग्रंथाच्या सामूहिक पारायणाचे व महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ११ श्री यशवंत लिलामृत ग्रंथाचे सामुहिक पारायण दुपारी १२ वाजता महाआरती, दुपारी १२.३० वाजता महाप्रसाद व भजन या सोहळ्याचे आयोजन श्री यशवंत लिलामृत ग्रंथ पारायण समिती, श्री यशवंत परिवार सेवाभावी संस्था (मुसळखेडा) आणि श्री यशवंत युवा मंडळ, पवनी (स.) यांच्या वतीने करण्यात आले आहे. आयोजकांनी दिलेल्या विशेष सूचनेनुसार ज्या महिला भाविकांना पारायण सोहळ्यात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी स्वतःचा ग्रंथ सोबत घेऊन यावा. तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या सामुहिक पारायण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वंदना केने (९४२०१६९३३४) आणि सतवंतसिंग अंधरेले (९८८१३६४८२३) यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# जनता इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या गाण्यांवर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आई आणि मुलाने राधा-कृष्णाची वेशभूषा धारण करुन सादर केलेल्या मनमोहक नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. यावेळी दहीहंडीचा




कार्यक्रमही उत्साहात घेण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत दहीहंडीचा आनंद लुटला. पारंपरिक वेशभूषा, नृत्य आणि दहीहंडीमुळे संपूर्ण शाळेचे वातावरण कृष्णमय झाले.

या कार्यक्रमाला जनता शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापिका जयश्री आंडे उपस्थित होत्या. संचालक मंडळ व जयश्री आंडे यांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांच्या उत्स्फूर्त सहभाग व सुंदर सादरीकरणाचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे संचालन तेजस्विनी काळे तर आभार रोशनी खंडाईतकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्योती बोरकुटे, मंजुषा शिंगरवाडे, निलीमा फरकाडे, ममता अकर्ते, रोशनी खंडाईतकर, तेजस्विनी काळे, पल्लवी अकोटकर, स्वाती खेरडे, मीना देशमुख, उत्कर्षा तरार, श्रध्दा आंडे, प्रणव काळे, स्नेहल येवले व शीतल कळंबे यांनी परिश्रम घेतले.

# ऑगस्टमध्ये एसटीच्या उत्पन्नात ६६ कोटींची वाढ : प्रवाशांच्या मागणीनुसार फेऱ्या वाढविण्याचा सकारात्मक परिणाम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – एसटी महामंडळाच्या उत्पन्नवाढीसाठी एसटी महामंडळाने राबविलेल्या उपक्रमांचा परिणाम आता दिसून येऊ लागला आहे. जुलै महिन्याच्या तुलनेत ऑगस्टमध्ये एसटीच्या उत्पन्नात तब्बल ६६ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार फेऱ्या वाढविल्यामुळे हा परिणाम दिसून आला आहे. महामंडळाने उत्पन्नवाढीसाठी सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाल्याने एसटीच्या तोट्याचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. आगामी काही महिन्यांत एसटीचा चालू तोटा भरून काढण्याच्या दिशेने महामंडळाची वाटचाल सुरू झाली आहे.

### हिवरखेडच्या महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

# प्राचार्यपदी डॉ.प्रा.सुभाष पारीसे यांची निवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिवरखेड** – स्थानिक सर्वोदय शिक्षण समिती द्वारा संचालित, महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड येथे कार्यरत असलेले सेवा जेष्ठ प्रा.डॉ.सुभाष मारोतराव पारीसे यांची महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदी निवड करण्यात आली.

सर्वोदय शिक्षण समितीची कार्यकारिणी मंडळ अध्यक्ष साहेबराव पाटील, उपाध्यक्ष वसंतराव तडस, सचिव प्रकाश भोजने, सदस्य मदनलाल शर्मा, रविंद्र वासनकर, पांडुरंग पाटील, रमेशराव भोजने उपस्थित होते. याप्रसंगी नवनिर्वाचित मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा.डॉ.सुभाष पारीसे यांना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत व अभिनंदन केले तसेच पुढील यशस्वी वाटचाली मनस्वी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

### गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालयात

# ठाणेदार राहुल गवई यांचे 'व्यसनाधिनता' प्रबोधनपर मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**वरुड** – गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे 'ऑपरेशन कवच' या विशेष उपक्रमांतर्गत पोलीस स्टेशन शेंदुरजनाघाटचे ठाणेदार राहुल गवई यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी त्यांचे सहकारी विजय दरवाई, विजय काळभोर आदी उपस्थित होते. यावेळी ठाणेदार राहुल गवई यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शरीर, मन आणि सामाजिक जीवनावर होणारे घातक परिणाम समजावून सांगितले. तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, संस्कार आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले तसेच समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण झाली असून, निरोगी व सुरक्षित समाज घडविण्यासाठी पोलिस विभागाच्या या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर श्रीराव, शिक्षक ममता खासबागे, सतीश नेरकर, कुमुद भोरकर, शिक्षकेत्तर कर्मचारी हेमंत चौकडे हिरेंद्र देसली लक्ष्मीकांत बिलथारिया आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# जरुड हायस्कूल येथील विद्यार्थ्यांची स्मृती भवन व विज्ञान अभिनव उपक्रमास शैक्षणिक क्षेत्र भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – जरुड हायस्कूल, जरुड येथील विद्यार्थ्यांनी अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती भवन व विज्ञान अभिनव उपक्रमास शैक्षणिक क्षेत्रभेट दिली.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील विषयांचे प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि विविध वैज्ञानिक संकल्पना समजाव्यात, या उद्देशाने या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध प्रयोग, उपकरणे व त्यांची माहिती घेतली. विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून समजून घेत विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासोबतच निरीक्षणशक्ती आणि प्रश्नवृत्ती विकसित होण्यास मदत झाली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली झालेली ही क्षेत्र भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व अविस्मरणीय ठरली.



**वरुड** : स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस यांना वाढदिवसानिमित्ताने तैलचित्र भेट देतांना डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, माजी सरपंच मनोज पेलागडे, व्यावसायिक विनय शाह, इंजि.धिरज गुल्हाने तथा लोकेश गुल्हाने.

### न.प. प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये

# गोकुळाष्टमी उत्साह आणि भक्तीमय वातावरणात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ येथे काल गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या राधा-कृष्ण स्पर्धेत प्री-प्रायमरी गट आणि इयत्ता पहिली व दुसरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रंगीबेरंगी पोशाख, हातात बासरी आणि डोक्यावर मोरपीस लावून सजलेले हे बालगोपाळ सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर दुसरीकडे, इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी थरारक दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'गोविंदा रे गोपाळा'च्या गजरात विद्यार्थ्यांनी रचलेले मानवी मनोरे आणि दहीहंडी फोडतानाचा त्यांचा उत्साह उपस्थितांची मने जिंकले.

या संपूर्ण कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्य प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवत त्यांना गोकुळाष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे अचूक आणि निष्पक्ष परीक्षण करण्यासाठी न.प. शाळा क्रमांक ४ च्या शिक्षिका भावना मेंढे व नेहा जाधव यांनी परीक्षक म्हणुन उपस्थित राहून आपली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आशिष तडस होते.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक साहेबराव उईके, विजय बेलसरे, संदीप कोकाटे, सविता बोबडे, भाग्यश्री चौधरी, शालिनी फरकाडे, सुनीता उपासे, मीनल गोरडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी हर्षदा श्रीखंडे व अनिता दुपारे यांनी उपस्थित राहून आपले बहुमूल्य योगदान दिले.

# स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्राची ठाकरे, ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे, बी.सी.ए.विभागप्रमुख प्रा.अनुप बेले, बी.बी.ए.विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बी.ए.जे.एम.सी विभागाचे प्रा.राहुल शिवारे, सांस्कृतिक कमिटी अध्यक्ष प्रा.संजीवनी बारस्कर यांच्यासह प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.प्रफुल्ल बहुरूपी, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा.चेतन ढोले, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा.अस्मिता गेडाम, प्रा.गौरी कुबडे, प्रा.धनश्री खंडार, प्रा.चेतना सावरकर आणि प्रा.कविता बेहेरे तसेच योगप्रशिक्षक प्रीती महात्मे यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.आशिष शहाणे यांनी केले. यावेळी प्रा.चेतन गणोरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असतात, असे त्यांनी सांगितले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी जीवनातील विविध क्षेत्रांत यश संपादन करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. शिक्षक दिनाच्या कार्यक्रमामुळे महाविद्यालयात उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरण निर्माण झाले होते.

# ११ कंपन्या, ७ हजार कोटी! आयपीओ बाजारात चालू आठवड्यात निधी सज्जता

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

**नवी दिल्ली** – प्राथमिक बाजारात पुन्हा एकदा मोठी हालचाल पाहायला मिळणार आहे. रेंटोमोजो, करमतरा इंजिनिअरिंग आणि मनोहर इलेक्ट्रिकल्स यांसारख्या ११ प्रमुख कंपन्या त्यांच्या प्राथमिक भागविक्रीद्वारे (आयपीओ) ७,०५५ कोटी रुपये उभारण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. हे सर्व आयपीओ ७ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर दरम्यान बाजारात येणार असून, बहुतेक कंपन्यांचे इश्यू मंगळवार आणि बुधवारी अर्जांसाठी उपलब्ध होतील. प्राथमिक बाजारात उतरणाऱ्या या कंपन्यांमध्ये रिअल इस्टेट डेव्हलपर्स, इंजिनिअरिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपन्या, पेमेंट अँड आयडेंटिटी सोल्युशन्स प्रदाता, स्पेशालिटी केमिकल्स उत्पादक आणि ऑनलाइन रेंटल प्लॅटफफॉर्मचा समावेश




आहे. एकूण ७,०५५ कोटी रुपयांपैकी २,७२२ कोटी रुपये (३९ टक्के) नवीन शेअर्सच्या विक्रीद्वारे उभारले जातील, ज्यांचा निधी थेट कंपनीकडे जाईल. तर ४,३३३ कोटी रुपये (६१ टक्के) हे विद्यमान भागधारकांद्वारे 'ऑफर फॉर सेल' (ओएफएस) अंतर्गत विकले जातील.

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७१४/२०२६** **ने.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) शेख युनुस शेख उस्मान, वय अं.३३ वर्ष, धंदा-मजुरी

२) शहनाज परवीन शेख उस्मान, वय अं.२६ वर्ष, धंदा-घरकाम

दोघेही रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत खातुनबी शेख उस्मान, मयत रेहानबी शेख अस्मान व मयत शेख हमीद शेख उस्मान, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९८/२०२६** **ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) बेबीताई बबा ठाकरे, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम, २) छबी उर्फ शालीनी सुरेशराव गुडधे, वय अं.५९ वर्ष, धंदा-घरकाम, ३) रेखा महेंद्र सोनाटाके, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, ४) दिपक दयाराम कोहळे, वय अं.५६ वर्ष, धंदा-शेती, ५) वंदना दिलीपराव कोहळे, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम, ६) मयुर दिलीपराव कोहळे, वय अं.३० वर्ष, धंदा-नोकरी, ७) वैष्णवी दिलीपराव कोहळे, वय अं.२७ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ रा.वरुड, ता.वरुड, क्र.२ रा.डोंगरयावली, ता.मोर्शी, क्र.३ रा.फत्तेपुर, ता.वरुड, क्र.४ ते ७ रा.पवनी सक्राजी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे अन्नपुर्णा दयाराम कोहळे, रा.पवनी सक्राजी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९६/२०२६** **ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती प्रतिभा गंगाधर नेरकर, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम

२) गिरीष गंगाधर नेरकर, वय अं.४३ वर्ष, धंदा-व्यापार

३) वैभव गंगाधर नेरकर, वय अं.४१ वर्ष, धंदा- व्यापार

४) अश्विनी निलेश बानाबाकोडे, वय अं.३९ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, क्र.४ रा.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे गंगाधर शंकरराव नेरकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७०२/२०२६** **ने.ता.२२/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती स्वाती उमेशराव यावलकर, वय अं.४०वर्ष, धंदा-घरकाम

२) सानवी ऊमेश यावलकर, वय अं.१६ वर्ष, धंदा-शिक्षण

३) लिलाबाई वसंतराव यावलकर, वय अं.८० वर्ष, धंदा-काही नाही

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे ऊमेश वसंतराव यावलकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

# राज्यातील नामांकित इंग्रजी निवासी शाळांची झाडाझडती : आदिवासी विकास विभागाचा निर्णय

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**



**मुंबई** – आदिवासी विकास विभागाने शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांच्या पाठोपाठ आता नामांकित इंग्रजी निवासी शाळांची झाडाझडती घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या योजनेंतर्गत ज्या शाळांमध्ये त्रुटी आढळून येतील, त्यांची मान्यता रद्द करण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे.

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शहरी जीवनाची तोंडओळख व्हावी आणि त्यांना इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. नामांकित शाळांची निवड करण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली नामांकित शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार शालेय मूल्यांकनात ६० पेक्षा कमी गुण मिळालेल्या शाळा नामांकित योजनेसाठी अपात्र ठरतात. अशा शाळेविरोधात तक्रार प्राप्त झाल्यास, मूल्यांकनात ६० पेक्षा कमी गुण आढळल्यास किंवा आवश्यक भौतिक आणि पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निर्दर्शनास आल्यास आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त संबंधित शाळेच्या सखोल तपासणीसाठी चौकशी पथक गठित करतील.

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७५१/२०२६** **ने.ता.०७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती शुभांगी गजानन थेटे, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम

२) प्रणय गजानन थेटे, वय अं.२६ वर्ष, धंदा-शिक्षण

३) कु.दामीनी गजानन थेटे, वय अं.२४ वर्ष, धंदा- शिक्षण

अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे गजानन शेषरावजी थेटे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७५३/२०२६** **ने.ता.०३/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) शांताबाई मधुकरराव लोहे, वय अं.७५ वर्ष, २) कलावती माणिकराव थेटे, वय अं.७२ वर्ष, ३) सिंधु नामदेव कोहळे, वय अं.६२ वर्ष, ४) अमोल नामदेवराव कोहळे, वय अं.३८ वर्ष, ५) प्रितम नामदेवराव कोहळे, वय अं.३७ वर्ष, ६) देवीदास नत्थुजी कोहळे, वय अं.६३ वर्ष, ७) वासुदेव नत्थुजी कोहळे, वय अं.६५ वर्ष, ८) सुखदेव बाबुराव कोहळे, वय अं.६५ वर्ष, ९) अरुण बाबुराव कोहळे, वय अं.६१ वर्ष, १०) मोनीका नरेंद्र तायडे, वय अं.३३ वर्ष, ११) श्रुतिका नरेंद्र तायडे, वय अं.३१ वर्ष, १२) बेबीबाई बाबा ठाकरे, वय अं.६३ वर्ष, १३) छबी उर्फ शालीनी सुरेशराव गुडधे, वय अं.५१ वर्ष, १४) रेखा महेंद्र सोनाटाके, वय अं.६० वर्ष, १५) दिपक दयाराम कोहळे, वय अं.५६ वर्ष, १६) वंदना दिलीपराव कोहळे, वय अं.५० वर्ष, १७) मयुर दिलीपराव कोहळे, वय अं.३० वर्ष, १८) वैष्णवी दिलीपराव कोहळे, वय अं.२७ वर्ष, अर्जदार क्र.१, १० व ११ रा.अमरावती, क्र.२ रा.टेंभुरखेडा, क्र.३,६ व १२ वरुड, क्र.७ नागपूर, क्र.८ औरंगाबाद, क्र.१३ डोंगरयावली, क्र.१४ फत्तेपुर, क्र.९, १५ ते १८ रा.पवनी सक्राजी

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे सारजाबाई गोविंदराव कोहळे, रा.पवनी सक्राजी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९९/२०२६** **ने.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती आशाबाई पंजाबराव लोखंडे, वय अं.६४ वर्ष, धंदा-गृहिणी, २) आशिष पंजाबराव लोखंडे, वय अं.३२ वर्ष, धंदा-मजुरी, ३) आकाश पंजाबराव लोखंडे, वय अं.३० वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ३ रा.करजगांव (गांधीघर), ता.वरुड, ४) वैशाली विजय हिवराळे, वय अं.३७ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.वाघोडा, ता.सावनेर, ५) कविता विशाल काचेवार, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.मुक्तापुर पेठ, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत पंजाबराव अजाबराव लोखंडे, रा.करजगांव ( गांधीघर ), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१९/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४७/२०२६** **ने.ता.०१/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) तौकीर अन्वर मुजीब खान, वय अं.२६ वर्ष, धंदा-व्यवसाय, २) असर उमेर मुजीब उर्फ मोजिद खान, वय अं.२७ वर्ष, धंदा- व्यवसाय, ३) आशीयाबी मुजीब उर्फ मोजिद खान, वय अं.५५ वर्ष, धंदा- घरकाम, सर्व रा.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत दाऊद खॉ अब्बास, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




ग्रामंपचायत अधिकारी तालुका शाखा वरुडच्या

# अध्यक्षपदी प्रशांत वानखडे तर सचिवपदी विनोद वडस्कर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसाठी महत्वपुर्ण समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी तालुका शाखा वरुड डि.एन.ई.१३६ च्या नविन कार्यकारीणीची निवड नुकतीच पार पडली. त्यामध्ये अध्यक्षपदी लोणीचे ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत वानखडे, सचिव विनोद वडस्कर, उपाध्यक्ष प्रदीप कवटकर तर संघटपदी सतिश गिरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

जरुड येथील ग्रामपंचायत अधिकारी संजय दांदळे यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ग्रामपंचायत अधिकारी तालुका शाखा वरुड डि.एन.ई.१३६ च्या नविन कार्यकारीणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. त्यामध्ये लोणीचे ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत उध्दवराव वानखडे यांची अध्यक्षपदी, सचिव विनोद रामदास वडस्कर, उपाध्यक्ष प्रदीप जगन्नाथ कवटकर, महिला उपाध्यक्ष वैशाली राजकुमार चांदुरकर, कोषाध्यक्ष मनोज गुणवंत राऊत, सहसचिव सुशिल नत्थु कुसळे, कायदेशिर सल्लागार विनोद ज्ञानेश्वर कपले, प्रसिध्दीप्रमुख अतुल बाबाराव यावले, संघटक सतिश ओंकार गिरी, महिला संघटक सरिता रामदास पुंड, महिला सदस्य शुभांगी कोकाटे यांचा समावेश आहे.

नवनियुक्त कार्यकारीणी अमरावती जिल्हाध्यक्ष आशिष भागवत यांचे सुचनेनुसार तयार करण्यात आली असून सर्व नवनियुक्त पदाधिऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

## आष्टी मतदारसंघाचा कायापालट!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघातील नगरपंचायत आणि ग्रामपंचायत स्तरावर आधुनिक फिश मार्केट उभारणीच्या कामाला गती द्यावी. अशा स्पष्ट सूचना राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या आहेत. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत आष्टी विधानसभा क्षेत्रात आधुनिक फिश मार्केट उभारणीस प्रशासकीय मंजुरी देणे व आवश्यक निधी उपलब्ध करून देणे या विषयावर मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

# उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीचे प्रभारी झाल्यानंतर विनोद तावडे पहिल्यांदाच उत्तर प्रदेशात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – भाजपने उत्तर प्रदेशात सत्तेची हॅटट्रिक साधण्याची तयारी सुरू केली आहे. दोन दिवसीय लखनौ दौऱ्यादरम्यान, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि उत्तर प्रदेशचे प्रभारी विनोद तावडे यांनी 'मिशन २०२७' साठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. लखनौमध्ये दाखल झालेल्या तावडे यांनी, संघटना सुव्यवस्थित करण्यापासून ते प्रचाराची दिशा ठरवण्यापर्यंत, विजयाची हॅटट्रिक साधण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे मांडली. आपल्या दोन दिवसांच्या वास्तव्यादरम्यान, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या तयारीचा आढावा घेतला. त्यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. त्यांनी संघटनेच्या सदस्यांसोबत विचारमंथन करून संपूर्ण आराखडा तयार केला. तावडे यांनी २०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या अधिकाऱ्यांना लक्ष्य दिले. ते म्हणाले की, आपण प्रत्येक बूथ मजबूत केला पाहिजे, कोणताही बूथ सुटता कामा नये आणि यासाठी एक विशिष्ट कृती योजना विकसित केली पाहिजे.

शहापुर येथील जि.प.पुर्व माध्यमिक शाळेत

# 'रक्षण करु या पर्यावरणाचे' या उपक्रमांतर्गत रक्षाबंधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथुन जवळच असलेल्या शहापुर येथील जि.प.पुर्व माध्यमिक शाळेत राखी हा उपक्रम आगळया वेगळया पध्दतीने आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत आयोजीत करण्यात आला होता.

आजच्या तपावपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांना हसतखेळत शिक्षण फार गरजेचे आहे. त्याकरीता मुल्यवर्धप उपक्रम अत्यंत उपयोगी आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जि.प.पुर्व माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांनी 'रक्षण करु या पर्यावरणाचे' या उपक्रमात वृक्षांना राखी बांधून पर्यावरण रक्षण संकल्प घेवुन रक्षाबंधन उपक्रम साजरा केला.

या उपक्रमासाठी माजी सरपंच शारदा पाटील, पोलिस पाटील विनिता बघेल, ग्रा.पं.माजी सदस्य दुर्गा भटकर, व्यवस्थापन समिती अध्यक्ष अर्चना घोरपडे, उषा राऊत, राबीया कौसर यांनी विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले व त्यांना रोख रक्कम बक्षिस रुपाने देवुन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. माजी मुख्याध्यापक अनिल चहांदे व जरुड केंद्राचे केंद्रप्रमुख दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमा करीता शाळेचे सर्व शिक्षक, आशा चहांदे, रंजना बुरंगे, सिमा कांडलकर, अरुण देशमुख, मनिष दिघेकर, गोपाल वानखडे, संजय गाडबैल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व समजावुन देवुन हा उपक्रम यशस्वी केला. शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, ग्रामपंचायतमधील सर्व मान्यवर व गावकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होवुन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

आरोग्य मंत्र्यांचा 'परफॉर्मन्स मंत्र'

# अधिकाऱ्यांना पुढची जबाबदारी कामगिरीनुसार, नियुक्त्यांमध्येही गुणवत्तेला प्राधान्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – सार्वजनिक आरोग्य विभागात कामगिरीच्या आधारे अधिकाऱ्यांना संधी देण्याची नवी कार्यसंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे दरवर्षी वस्तुनिष्ठ पद्धतीने गुणांकन करण्यात येणार असून, मागील तीन वर्षांतील त्यांच्या कामगिरीच्या आधारे श्रेणी निश्चित केली जाणार आहे.

या श्रेणीचा उपयोग जबाबदाऱ्यांचे वाटप तसेच पुढील तीन वर्षांत काय करणार याचे नियोजन याचा भविष्यातील नियुक्त्यांच्या वेळीही केला जाणार आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागात केवळ सेवाज्येष्ठतेला नव्हे, तर प्रत्यक्ष कामगिरी, नेतृत्वक्षमता, रुग्णसेवा, आर्थिक शिस्त, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला महत्त्व मिळणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांच्या क्षमतेनुसार जबाबदारी देण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने अधिकाऱ्यांचे मनोबल उंचावण्यासही मदत होणार आहे.

३१ मार्च २०२६ रोजी किमान तीन वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या कामाची माहिती अद्ययावत करून त्यांचे गुणांकन केले जाणार आहे. सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन वर्षांतील पदावरील कामकाजाचा विचार करून एकूण १०० गुणांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे.

या गुणांकनानुसार अधिकाऱ्यांचे अ, ब, क, ड अश्या चार श्रेणींत वर्गीकरण केले जाणार आहे. म्हणजेच, तीन वर्षांची कामगिरी आता अधिकाऱ्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे व दरवर्षी असे गुणांकन केले जाणार आहे.

आरोग्य संस्थांमध्ये आहार, औषधांचा पुरवठा, स्वच्छता आणि कंत्राटी मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर करून आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी केलेली कार्यवाहीही गुणांकनाचा भाग असेल. अधिनस्त रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमधील मनुष्यबळाचे व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्ती, साथीचे आजार व अपघातांच्या काळातील कामगिरीलाही महत्त्व दिले जाणार आहे.

